# RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY

"(Established by Government of Central Provinces Education Department by Notification No. 513 dated the 1st of August, 1923 & presently a State University governed by Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. Act No. VI of 2017).)"

**Office of the Director, Board of Examination and Evaluation**
**(Ph.D. Cell)**
**Examination Bhawan, Laxminarayan Institute of Technology Premises,**
**Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University,Nagpur-440033**


क्रमांकः रातुमनावि/आचार्य पदवी कक्ष/पेट–२०१७/ 458          दिनांकः 27/08/2018

## सत्र २०१८–२०१९ मध्ये एम.फिल. अभ्यासक्रमात विशेष प्रवेश घेण्याकरिता प्रवेश परीक्षेबद्दल सुचना

## (एम. फिल/आचार्य पदवी निर्देश क्रमांक ३७/२०१७ नुसार)

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाअंतर्गत ज्या ज्या पदव्युत्तर शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालयांमध्ये सत्र २०१८–२०१९ मध्ये विद्यापीठाव्दारे एम.फिल. अभ्यासक्रम राबविण्याची परवानगी देण्यात आलेली आहे अश्या महाविद्यालयामध्ये एम.फिल. अभ्यासक्रमात प्रवेश घेण्याकरिता प्रवेश परिक्षा निर्देश क्रमांक ३७/२०१७ मधील तरतूदीनुसार प्रवेश परीक्षा–१ आणि २ परीक्षा उत्तीर्ण करणे बंधनकारक करण्यात आलेली आहे. तरि परंतु सत्र २०१८–२०१९ करिता केवळ एम.फिल अभ्यासक्रमात प्रवेश घेण्याकरिता विशेष बाब म्हणून प्रवेश परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी म्हणजे दिनांक १७.१.२०१८ ते १९.१.२०१८ रोजी संपन्न झालेल्या एम.फिल. /आचार्य पदवी प्रवेश परीक्षेत उत्तीर्ण झालेले विद्यार्थी सुध्दा एम.फिल. अभ्यासक्रमात प्रवेश घेण्यासाठी पात्र असतील. एम.फिल. अभ्यासक्रमात प्रवेश घेण्याकरिता निर्देश क्रमांक ३७/२०१७ मधील तरतूदीनुसार व नमूद अटी व शर्तीनुसार पदव्युत्तर अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सत्र २०१८–२०१९ करिता प्रवेश परीक्षेचे ऑनलाईन आवेदन दिनांक २८.८.२०१८ पासून www.rtmnupgadm.org वर M.Phil. Entrance Test वर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आवेदन करण्याची शेवटची दिनांक ३१.८.२०१८ संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत निर्धारित करण्यात आलेली आहे. प्रवेश परिक्षाचे आयोजन इंग्रजी, मराठी आणि हिंदी या तिन्ही भाषेत करण्यात येणार आहे. सविस्तर वेळापत्रक नमूद संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

मा. कुलगुरुंचे आदेशान्वये

(डॉ. निरज खटी)
संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर